ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ८ ऑगस्ट, १९५१ अंक ३२

## विविध माहिती

**बिहारमधील ग्रामोद्योग—** बिहार राज्यांतील ग्रामोद्योगांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारनें ३० लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील ग्रामोद्योगांची व कुशल कामगारांची गणति करणें आणि ग्रामोद्योगांच्या विपन्नावस्थेचें संशोधन करणें हीं दोन कामें योजनेंत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. हीं व इतर कामें करण्यासाठीं पाटणा येथील ग्रामोद्योग संस्थेचें रूपांतर तांत्रिक शिक्षणशाळेंत करण्यांत येणार आहे.

**जमीनदारीच्या नाशाचा परिणाम—** राजस्थानमधील जमीनदारी रद्द करण्याचें ठरून जमीनदारांना नुकसान-भरपाई देण्याचें ठरलें आहे. परंतु नुकसान-भरपाईची रक्कम उभारणें कठीण जात असल्यामुळें जमीनदार-जहागिरदारांची कांहीं जंगम मालमत्ता विकून पैसे उभे केले जाणार आहेत, असें समजतें. राजेरजवाड्यांच्या मोटारी, फर्निचर, राजवाडे, इत्यादींचीहि विक्री करण्यांत येईल. हें काम करण्यासाठीं व खर्चांत काटकसर करण्यासाठीं राजस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे.

**सुरत जिल्ह्यांत नवीन जातीचा कापूस—** सुरत जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं, लांब धागा निघूं शकणाऱ्या कापसाची लागवड करण्यांत येत आहे. सुमारें ५०० एकरांत लागवड करण्यांत आली आहे. सुरवातीला पाऊस पुरेसा पडला नसतांहि रोपें टिकून आहेत असें समजतें. भारताला लांब धाग्याचा कापूस मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो, हें प्रसिद्धच आहे.

**महात्माजींचें जीवन-चरित्र—** महात्मा गांधींचें जें अष्टखंडात्मक चरित्र श्री. तेंडोलकर लिहीत आहेत, त्यापैकीं पहिला खंड येत्या १५ ऑगस्ट रोजीं प्रसिद्ध होणार आहे. ह्या चरित्राच्या कामीं ग्रंथकाराला खुद्द महात्माजींचें सहकार्य लाभलें होतें. चरित्राला पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं पुरस्कार लिहिला आहे.

**काश्मीरमधील रेशमाचा धंदा—** काश्मीरमधील रेशमाचा धंदा अधिक वाढविण्यासाठीं तावडतोबीचे उपाय योजण्याचें काश्मीर सरकारनें ठरविलें आहे. ह्या धंद्यापासून सरकारला दरवर्षी ५० लाख रुपयांची प्राप्ति होते. जपानकडून १ लाख पौंड कच्चें रेशीम विकत घेण्यांत येणार आहे. त्यासाठीं २५ लाख रुपये द्यावे लागतील. त्याशिवाय रेशमाच्या किड्यांची १५,००० औंस अंडींहि ८ लाख रुपयांना विकत घेण्यांत येणार आहेत. फ्रान्समधून ६ लाख रुपयांची यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. जपानकडूनहि यंत्रसामुग्री व तज्ज्ञ मिळविण्याची खटपट चालू आहे.

**'हा पहा भारत !'—** हॉलिवुडमधील एक चित्रपट-निर्माते, मि. पीटर फ्रँकलिन हे सध्या भारतांत फिरत आहेत. "हा पहा भारत !" ह्या शीर्षकाखालीं भारतामधील प्रेक्षणीय ठिकाणांचे अनुबोधपट ते घेत आहेत. हे बोलपट रंगीत आहेत. दिल्ली, आग्रा, जयपूर, बनारस, हैद्राबाद, मथुरा, त्रिवेंद्रम्, म्हैसूर, मुंबई, श्रीनगर, इत्यादि मोठमोठ्या शहरांतील प्रेक्षणीय स्थळांविषयीं ते बोलपट काढणार आहेत. त्याशिवाय पुढील वर्षी इंग्लिश भाषेंत एक दीर्घ बोलपट काढण्याची व्यवस्था ते करीत आहेत. ह्या बोलपटांत हिंदी आणि अमेरिकन नट कामें करणार आहेत.

**मद्रास राज्यांत यांत्रिक हत्यारांचा कारखाना—** कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करणारा एखादा कारखाना मद्रास राज्यांत काढतां येणें शक्य आहे किंवा नाहीं, ह्याची चौकशी करण्यासाठीं मद्रास सरकारनें एक कमिटी नेमली आहे. एका इंग्लिश एंजिनिअरनें सुचविलेल्या योजनेची तपासणी कमिटी करणार आहे. खाजगी एंजिनिअरिंग कारखान्यांचीहि तपासणी कमिटी करणार आहे. कमिटीवर पांच बिन-सरकारी तंत्रज्ञ आणि तीन सरकारी नोकर आहेत.

**ग्रामोद्योगांसाठीं जपानी तज्ज्ञ—** त्रावणकोर-कोचीन संस्थानांत ग्रामोद्योगांचा विकास करण्यासाठीं एक केंद्र लवकरच उघडण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत कामगारांना निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्यांत येणार आहे. मि. अढाची नामक जपानी ग्रामोद्योग-तज्ज्ञानें जपानहून तज्ज्ञ शिक्षक आणण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें.

**दुधाच्या भुकटीचा धंदा—** भारतांतील दुधाच्या भुकटीच्या धंद्याला संरक्षण देण्याची मागणी त्या धंद्यानें आपल्यापुढें शाबीत केली नाहीं, असें टॅरीफ बोर्डानें ठरविलें होतें. बोर्डानें आपल्या ह्या मताप्रमाणें सदर धंद्याला संरक्षण देण्यांत येऊं नये अशी सूचना केली होती. ही सूचना भारत सरकारनें मान्य केली आहे.

**वांशिक पक्षपाताची आर्थिक किंमत—** अमेरिकेंतील श्वेतवर्णीयांखेरीज इतरांना ज्या अपमानास्पद रीतीनें वागविण्यांत येतें त्यामुळें अमेरिकन कारखानदारांचें दरवर्षी ३ हजार कोटी डॉलर्स नुकसान होतें, असें सार्वजनिक मताचा अंदाज घेणाऱ्या एका अमेरिकन तज्ज्ञानेंच जाहीर केलें आहे. वांशिक भेदावर आधारलेली गैरवागणूक अमेरिकेंतील निग्रो लोकांना मुख्यतः सोसावी लागते.

## परदेश गमन

### श्री. भा. वि. धारपुरे

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचे क्युरेटर श्री. भा. वि. धारपुरे लंडन येथील फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन प्रदर्शनाचा अभ्यास करण्यासाठीं ता. १० रोजीं निघणार आहेत. पॅरीसमधील युनेस्कोचा संग्रहहि ते अवलोकन करणार आहेत. श्री. धारपुरे हे संग्रहालयाचे वतीनें जात असून त्यास मुंबई सरकारची पूर्वसंमतीहि मिळालेली आहे. त्यांना जाण्याचे कामीं बिस्किट कारखानदार श्री. ग. रा. साठे, परशुराम पॉटरी वर्क्सचे श्री परशुरामपंत गणपुले, श्री. चंद्रशेखर गो. आगाशे व रा. ब. शेंबेकर ह्यांनीं सक्रिय सहानुभूति म्हणून प्रत्येकानें ५०० रु. दिले आहेत. हे चौघेहि संग्रहालयाचे विश्वस्त आहेत. रा. ब. शेंबेकर ट्रस्टनेंहि ५०० रु. दिले आहेत.

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. चे एक्स-ऑफिशिओ डायरेक्टर श्री. शंतनुराव किर्लोस्कर हे ता. ८ रोजीं युरोप–अमेरिकेकडे अभ्यास निघणार आहेत. सौ. यमूताई किर्लोस्करहि त्यांच्याबरोबर जाणार आहेत.

### श्री. ग. रा. साठे

साठे बिस्किट कं. चे मॅ. डायरेक्टर श्री. ग. रा. साठे हे नवी यंत्रसामुग्री आणण्यासाठी विलायतेस गेले आहेत.

### श्री. शंकरराव ओगले

ओगले ग्लास वर्क्स लि. चे सूत्रचालक श्री. शंकरराव ओगले ता. ७ ऑगस्ट रोजीं कोलंबो बंदरांतून एस. एस. वॉरविकशायर ह्या आगबोटीनें विलायतेस निघाले. त्यांच्याबरोबर सौ. ओगलेहि आहेत.

---

## युनायटेड वेस्टर्न बँक " शेड्यूल्ड " बँक झाली

युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा, ही आतां शेड्यूल्ड बँकांच्या यादींत समाविष्ट झाली आहे. ३१ डिसेंबर, १९५० अखेरच्या ताळेबंदाप्रमाणें तिचें वसूल भांडवल ५,६०,४६५ रु. होतें, तें आतां ६,४३,७६० रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड १,५१,००० रु. वरून १,६५,००० रु. वर गेले आहेत. बँकेचें खेळतें भांडवल ७९,००,००० रु. आहे. भारतांत एकूण फक्त ७७ शेड्यूल्ड बँका आहेत, त्यांत युनायटेड वेस्टर्नची आतां भर पडली आहे. श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम, हे मॅनेजर आहेत.

---

## टाटा स्टील कंपनीचा मोठा नफा

टाटा कंपनीस ३१ मार्च अखेर संपलेल्या वर्षी ८·२३ कोटी रु. नफा झाला. त्यांतून कर, मॅनेजिंग एजन्सी कमिशन, घसारा व कामगारांना बोनस ह्यांची तरतूद केल्यावर २·५ कोटी रु. निव्वळ नफा उरला. पूर्वीच्या विकीवर दर टनास ११ रु. वाढ सरकारनें मंजूर केली, ती हिशेबांत घेतलेली नाहीं. ती हिशेबांत घेतली असती, तर नफ्यांत १½ कोटींची भर पडली असती. २·१५ कोटी रुपये घसारा काढण्यांत आला असून मॅनेजिंग एजंटांना ४७ लक्ष, ७७ हजार रु. कमिशन मिळालें आहे.

---


दि

युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.



'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




# अर्थ

बुधवार, ता. ८ ऑगस्ट, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सरकारी कारभारांतील भ्रष्टाकार

### श्री. गोरवाला ह्यांचा अहवाल

भारताच्या आर्थिक नियोजन मंडळाला श्री. गोरवाला ह्यांनीं सरकारी कारभारासंबंधीं आपला अहवाल नुकताच सादर केला आहे. अहवालाच्या प्रारंभींच श्री. गोरवाला ह्यांनीं भारताच्या सध्याच्या राज्यसंस्थेचें स्वरूप विशद केलें आहे, आणि अशा राज्य-संस्थेचीं ध्येयें आणि तीं साध्य करण्याचे मार्ग ह्यांच्याविषयीं एक सर्वसामान्य सिद्धांत मांडला आहे. भारतीय राज्यसंस्थेचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे कीं, केवळ सुरक्षितता राखणाऱ्या राज्य-संस्थेचें रूपांतर आतां सर्वांच्या सुखाची चिंता वहाणाऱ्या राज्य-संस्थेंत झालें आहे. तात्त्विक दृष्ट्या वरील दोन प्रकारच्या राज्य-संस्थांत भेद असले तरी प्रत्यक्ष कारभार हांकण्याच्या दृष्टीनें दोहोंपुढील प्रश्न एकाच स्वरूपाचे आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीनें योग्य माणसांची निवड करणें, त्यांना इष्ट तें शिक्षण देणें आणि योग्य ठिकाणीं त्यांची नेमणूक करणें हे प्रश्न दोहोंनाहि सारखेच आहेत ह्यांत शंका नाहीं. श्री. गोरवाला ह्यांनीं चालू राज्यकारभाराकडे ह्याच दृष्टिकोनांतून पाहिलें आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

श्री. गोरवाला म्हणतात कीं सध्याचें राजयंत्र मूलतः निरोगी आणि अवघड कामें पार पाडण्यास समर्थ असें असलें तरी तें शिथिल झालेलें आहे, त्यावरील कामाचा बोजा वाढला आहे आणि त्यामुळें कामाचा उरक कमी झाला आहे. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची जागा ह्यांच्या किंमती फार चढल्यामुळें लोकांत असंतोष फार आहे. ह्या परिस्थितीला मंत्री, कायदे मंडळांचे सभासद आणि सरकारी अधिकारी सर्वच जबाबदार आहेत अशी लोकांची भावना झाली आहे. ही असंतोषाची भावना घालविण्यासाठीं राज्यकारभारांत अधिक सचोटी, समजूतदारपणा, कामाचा झटपट उरक व कार्यक्षमता, इत्यादींची आवश्यकता आहे. सर्वांत महत्त्वाचें कार्य आर्थिक स्वरूपाचें आहे. सध्या देशांत जी टंचाई आहे आणि वस्तूंच्या किंमती ज्या विलक्षण वाढलेल्या आहेत, त्यावर प्रथम तांतडीचे उपाय योजले गेले पाहिजेत. इतर कामेंहि महत्त्वाचीं आहेत. परंतु आर्थिक बाबतींत अपयश आल्यास तीं यशस्वी होऊनहि कांहीं उपयोग होणार नाहीं.

सध्यां परिस्थिति अशी आहे कीं सरकारजवळ चांगले अधिकारी मुबलक नाहींत. अर्थात् जे चांगले अधिकारी आहेत त्यांना महत्त्वाच्या जागीं नेमून त्यांचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करून घेतला गेला पाहिजे. दुसरी गोष्ट अशी कीं मध्यवर्ती सरकार व राज्यसरकारें ह्यांच्या उद्दिष्टांत, धोरणांत आणि अंमलबजावणींत विरोध असतां कामा नये. केवळ पैसे खर्च करण्याच्या बाबींतच नव्हे तर उत्पन्न सोडून देण्याच्या बाबींतहि एकसूत्रीपणा पाहिजे. राज्यकारभारांतील सचोटी अंतर्बाह्य स्वरूपाची असली पाहिजे. लांचलुचपत अगर दडपण आणणें ह्या प्रकारांनीं सचोटी नाहींशी होते. म्हणून कोणाहि विरुद्ध जबाबदार नागरिकांनीं वरील प्रकारच्या तक्रारी केल्या आणि त्या खऱ्या असाव्यात असें वाटलें, तर अशा तक्रारींची चौकशी झाली पाहिजे, मग संबंधित व्यक्ती कोणी मंत्री असो अगर कायदेमंडळाचे सभासद असो अगर एखादा बडा सरकारी अधिकारी असो. मंत्र्यांच्या बाबतींत अशी चौकशी अधिकारारूढ पक्षाकडून न होतां सरकारनें नेमलेल्या निवाडा–मंडळाकडून होणें जरूर आहे. एखादा बडा अधिकारी अगर त्याचे नातेवाईक एकदम श्रीमंत झाल्याचें दिसून आल्यास सदर अधिकाऱ्यानें लांचलुचपत घेतली असावी असें गृहीत धरण्यांत यावें, आणि तशी ती घेतलेली नाहीं हें सिद्ध करण्याची जबाबदारी त्या सरकारी अधिकाऱ्यावर टाकण्यांत यावी. मध्यवर्ती सरकारचें इन्कमटॅक्स खातें, कस्टम्सचें खातें आणि कॉमर्स खातें ह्या खात्यांबाबत अधिक तपास होणें आवश्यक झालेलें आहे. नोकऱ्यांच्या बाबतींत वशिल्याचा उपयोग फार केला जातो. हा प्रकार थांबविण्यासाठीं अगर शक्य तितका कमी करण्यासाठीं पब्लिक सर्व्हिस कमिशन, सिलेक्शन बोर्ड आणि सिलेक्शन कमिटी ह्यांचा व्यापक उपयोग करण्यांत यावा. सरकारी नोकरांना पक्षनिष्ठेपासून पूर्णपणें अलिप्त ठेवण्यांत आलें पाहिजे. आणखी एका प्रथेचा उल्लेख करणें आवश्यक आहे. सरकारच्या नोकरांना कंपन्यांकडून अगर व्यक्तींकडून मेजवान्या दिल्या जातात. ह्या कंपन्यांना अगर व्यक्तींना सरकारकडून कांहीं तरी मिळवावयाचें असतें असा लोकांचा समज होतो. म्हणून मंत्र्यांनीं व अधिकाऱ्यांनीं अशा समारंभांचीं आमंत्रणें स्वीकारूं नयेत, असें त्यांचेवर बंधन घालण्यांत यावें.

मंत्री, कायदेमंडळाचे सभासद आणि सरकारी अधिकारी ह्यांच्यांत परस्परांपासून भिन्न असल्याची भावना दृष्टीस पडते. सरकारी नौकरांच्या बाबतींत तर ही भावना प्रकर्षानें दिसून येते. मंत्र्यांचें कार्य धोरण आंखण्याचें आणि त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचें आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणीचें कार्य नौकरांनींच करावयाचें असतें. राज्यकारभाराबाबत अननुभवी असलेल्या मंत्र्यांचें आणि तज्ज्ञ नौकरांचें सहकार्य झालें तरच गाडा सुरळीतपणें चालू शकेल. ह्या बाबतींत राजकारणी पुरुषांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ते एकदम तज्ज्ञ कारभारी होऊंव शकत नाहींत. उलटपक्षीं, नौकरांनींहि अयोग्य ठिकाणीं सरकारच्या धोरणावर टीका करून राजकारणपटूंची झूल आपल्या खांद्यावर घेऊं नये. पौर्वापर्य विचार अथवा कोणतें काम आधीं करावें, कोणतें मागून करावें ह्यासंबंधीं विचार प्रथम झाला पाहिजे. त्यानंतर सचोटी, आणि मग समंजसपणा ह्या अनुक्रमानें राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणणें आवश्यक आहे. अन्नविषयक प्रश्न जसा गंभीर, विशाल आणि सार्वजनिक महत्त्वाचा आहे, तसाच राज्यकारभाराच्या सुधारणेचा आहे. म्हणून, मध्यवर्ती सरकारकडून एकसूत्रतेनें आणि तडफेनें मार्गदर्शन होणें आवश्यक आहे. नाहीं तर राज्यकारभार सुधारण्याच्या बाबतींत यश येणार नाहीं. हें कार्य करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारमध्यें दोघा जणांचें एक बोर्ड असावें. त्यापैकीं एक जण मंत्री असावा.

परंतु त्याच्यावर सारें संभाळण्याचा बोजा मात्र नसावा. हा मंत्री राजकारण्यांतील एखादी अनुभवी व्यक्ती असावी. समंजसपणा आणि सचोटी ह्या गुणांबद्दल त्यांची ख्याति असावी. दुसरा सभासद वरिष्ठ पदापर्यंत चढलेला एखादा सरकारी नोकर असावा. सरकारी नोकरांच्या वर्गांत त्याच्यासंबंधीं आदराची भावना मात्र वसत असली पाहिजे. ह्या वरिष्ठ नोकरालाहि खात्याच्या जबाबदारीपासून मुक्त ठेवण्यांत यावे. ह्या दोघांत मिळून राजकीय आणि कारभारविषयक अनुभव, शहाणपणा आणि अधिकार केंद्रित झालेले असावे.

## सहकारी शेती *

मुंबई राज्यांतील सहकारी शेतीवरील हें तिसरें प्रकाशन होय. सहकारी शेतीसारखा अत्यंत अवघड नि महत्त्वाचा प्रश्न प्रयोगादाखल मुंबई राज्यांत प्रत्यक्ष हाताळला जात असतांना त्यांतील निरनिराळया अंगोपांगांचो नि अडचणींची अधूनमधून चर्चा होणें, त्यांचेकडे सरकारचें व जनतेचें लक्ष वेधणें आवश्यक ठरतें. ह्या दृष्टीनें, श्री. तळपदे यांच्या पुस्तिकेचें स्वागत करावयास हवें. मुंबई सरकारच्या शेतीविषयक कायद्यांच्या अम्मलबजावणीमुळें इतर फायदे कांहींहि झालेले असोत, पण शेतीच्या उत्पादनांत म्हणावीशी वाढ झालेली दिसत नाहीं. पुरेशा भांडवलाचा अभाव हें एक त्यास कारण संभवतें. पण त्यापेक्षां महत्त्वाचें कारण म्हणजे शेतीचा धंदा अतिशय लहान प्रमाणांत करण्यांत येतो हें होय. मुंबई राज्यांतील जवळ जवळ निम्म्या शेतकऱ्यांची शेती पांच एकरांपेक्षां लहान आहे. लहान शेतकऱ्यांना आधुनिक यांत्रिक सामुग्री, शास्त्रीय ज्ञान, पुरेशा भांडवलाचा पुरवठा, वगैरे बाबतींत जरूर तो फायदा उठवतां येत नाहीं, तो त्यांना उपलब्ध करून देणें अतिशय मुष्किलीचें—जवळ जवळ अशक्य—होतें. अशा लहान शेतकऱ्यांनीं आपली जमीन नि साधनसामुग्री एकत्र आणून सर्वांनीं मिळून शेती केल्याशिवाय त्यांना तरणोपाय नाहीं. ही गोष्ट श्री. तळपदे यांनीं, उदाहरणादाखल शेतजमिनींचे लहान तुकडे एकत्रित करण्याच्या कायद्यांतील कांहीं कलमांचा विचार करून, सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सहकारी शेतीच्या मानल्या जाणाऱ्या चार प्रकारांपैकीं ज्यांत सभासदांकडून एकत्र शेती केली जाते अशा जॉईंट फार्मिंग व कलेक्टिव्ह फार्मिंग ह्या खऱ्या अर्थी सहकारी सोसायट्या होत असें जें श्री. तळपदे यांनीं म्हटलें आहे, त्याबद्दल कोणाचेंहि दुमत होणार नाहीं. खऱ्या अर्थाची सहकारी शेती सोसायटी यशस्वी व्हावयाची झाल्यास, शेतीचे उत्पादनांत निश्चित वाढ होणें, सभासदांचे उत्पन्नांत व रोजगारींत वाढ होणें, समान हितसंबंधांचे सभासद असणें, सोसायटीस उत्तम नेतृत्व मिळणें, सभासदांकडून मनापासून सक्रिय सहकार्य मिळणें व सभासदांनीं सोसायटीशीं एकनिष्ठ रहाणें ह्या गोष्टींची अत्यंत जरूरी आहे. त्यांचेशिवाय कोणतीहि सोसायटी निघूं अगर टिकूं शकणार नाहीं. सहकारी शेती सोसायटी काढूं इच्छिणारांनीं श्री. तळपदे यांनीं वर दिलेल्या अटींची प्रथम दखल घेणें जरूर आहे. मुंबई सरकारच्या सहकारी शेतीबाबतच्या पंचवार्षिक योजनेची रूपरेषा श्री. तळपदे यांनीं आपल्या पुस्तिकेंत देऊन ती योग्य व व्यवहार्य असल्याबद्दलचें आपलें मत दर्शविलें आहे. पांच वर्षांत काढावयाच्या एकूण ११२ सोसायट्यांपैकीं ९० सहकारी शेती सोसायट्या सप्टेंबर, १९५० पर्यंत अस्तित्वांत आल्या असून त्यांचे संबंधींची कांहीं माहिती प्रस्तुतच्या प्रकाशनांत आढळते. ३–४ वर्षांपूर्वी श्री. डब्ल्यू. बी. दोंदे यांनीं महाराष्ट्रांतील ७ पैकीं ५ सहकारी शेती सोसायट्यांची चांचणीवजा पहाणी केली होती. सबंध राज्यांतील प्रातिनिधिक अशा बऱ्याच सोसायट्यांची अधिक तपशीलवार पहाणी करण्याची वेळ आतां खास आली आहे. सहकारी इन्स्टिट्यूटनें अशी पहाणी करावी अगर करवून घ्यावी असें सुचवावेंसें वाटतें. अशा पहाणींतून सोसायट्या चालवतांना येणाऱ्या प्रत्यक्ष लहानसहान अडचणींची पूर्ण कल्पना येऊन त्यांच्या निवारणाचे मार्ग सुचतील, सुचवतां येतील. अशी पहाणी मुंबई राज्यांतच नव्हे तर सबंध हिंदुस्थानांत मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाहीं. शिवाय, सहकारी शेती सोसायट्यांपासून कोणकोणते प्रत्यक्ष फायदे मिळूं शकतात हें सहकारी शेतीचे प्रयोगांकडे मोठ्या अपेक्षेनें पहाणाऱ्या लहान शेतकऱ्यांना वरील पहाणीवरून कळून येईल. तसें झाल्यास, मुंबई सरकारचे सुप्रसिद्ध सहकारी अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता यांनीं प्रस्तुत पुस्तिकेस जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, 'प्रत्यक्ष पदरांत पडणाऱ्या आर्थिक फायद्याकरतां' विखुरलेले लहान लहान शेतकरी खऱ्या अर्थानें सहकारी शेतीचा अवलंब अधिक प्रमाणांत करतील यांत शंका नाहीं. शेवटीं, सहकारी शेतीवरील हिंदी वाङ्मयांत एका वाचनीय पुस्तकाची भर टाकल्याबद्दल श्री. तळपदे नि प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट यांचें मनःपूर्वक अभिनंदन करणें जरूर आहे.

रा. गो. का.

* लेखक-प्रकाशकः- श्री. आर. एम. तळपदे, सुपरिन्टेंडेंट, बॉंबे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, ९, बेकहाऊस लेन, मुंबई नं. १ पृष्ठ संख्या ७५. किंमत रु. १-८-०

## श्री. जोग ह्यांचा सन्मान

### लंडन बँकर्स इन्स्टिट्यूटचे फेलो.



दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. (मुंबई), सी. ए. आय. बी. (लंडन) ह्यांना लंडन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सनें फेलो निवडल्याची बातमी आली आहे. सप्टेंबरमध्यें पॅरीस येथें भरणाऱ्या इंटरनॅशनल बँकिंग समर स्कूलमध्येंहि त्यांना प्रवेश मिळाला आहे. युरोपांतील प्रमुख देशांतील बँकिंगचाहि ते अनुभव घेणार आहेत.

## श्री. सरय्या ह्यांच्या इशाऱ्यापासून सहकारी कार्यकर्त्यांची अपेक्षा

### चळवळीचा आढावा घेऊन धोरणाबाबत पुनः नवा निश्चय करा

श्री. संपादक 'अर्थ' पुणें यांसी कृ. न. वि. वि.

आपल्या दिनांक १ ऑगस्ट, १९५१ चे अंकांत 'सहकारी चळवळ वाजवी मर्यादेबाहेर जबाबदाऱ्या पत्करीत आहे काय?' ह्या मथळयाखालीं श्री. सरय्या यांनीं ऑक्सफर्ड येथील परिषदेंत वाचलेल्या निबंधाचा सारांश दिला आहे. सबंद निबंध आज उपलब्ध नसला तरी त्याचा सारांश प्रसिद्ध करून एका अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नास आपण चालना दिलेली आहे, ह्यांत संशय नाहीं. सारांशांतील मोजक्या वाक्यांवरूनहि श्री. सरय्या ह्यांना सहकारी चळवळींतील वाढत्या सरकारी हस्तक्षेपाबद्दल आणि तिच्या भवितव्याबद्दल वाटणारी चिंता स्पष्ट दिसून येत आहे.

श्री. सरय्या यांचा सहकारी चळवळींतील अनुभव व स्थान फार मोठें आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुस्थान सरकारनें एक नियोजन समिति नेमली होती. तसेंच, प्रि. ध. रा. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या शेती कर्ज–पुरवठा समितीचे ते एक सदस्य होते. ह्या त्यांच्या महत्त्वाच्या स्थानाचा विचार करतां, त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांना फार महत्त्व आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वच क्षेत्रांत नियोजनाची मागणी करण्यांत आली व आपल्या देशाची योग्य तऱ्हेनें भरभराट व्हावयाची असेल तर सर्व क्षेत्रांत नियोजन केलें पाहिजे असें प्रतिपादन करण्यांत आलें व त्यासाठीं तज्ज्ञांच्या समित्या नेमून त्यांचे अहवालहि प्रसिद्ध झाले. अर्थात, सहकारी चळवळहि त्यामधून सुटली नाहीं.

आपल्या देशाची घटना तयार करतांना 'सहकारी संघराज्य' हा अंतिम हेतु असावा असें सहकारी कार्यकर्त्यांनीं आग्रहानें सांगून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सहकारी चळवळीनें प्रवेश केला पाहिजे व त्या दृष्टीनें नवीन नवीन संस्था स्थापन झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला, एवढेंच नव्हे तर सहकारी चळवळीस दुसऱ्या चढाओढींचा त्रास होऊं नये म्हणून सर्व जबाबदाऱ्या आपण होऊन आपल्या शिरावर घेण्यांत सहकारी कार्यकर्त्यांनीं आग्रह धरला व त्यांत श्री. सरय्या यांचेसारखे अनुभवी सहकारी कार्यकर्ते होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

सहकारी चळवळीची प्रगति ठराविक काळांत व ठराविक प्रमाणांत झाली पाहिजे, त्यासाठी सरकारचें साहाय्य अवश्य पाहिजे, मात्र सरकारी नियंत्रण नको, ही सोवळी वृत्ति सोडण्याबाबत प्रि. ध. रा. गाडगीळ यांनीं पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र विभाग परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून स्पष्ट इशारा दिला होता. प्रि. गाडगीळ यांनीं तर आपल्या शेती पुरवठा समितीच्या (ज्याचे श्री. सरय्या हे सभासद होते) अहवालांत असें नमूद केलें आहे कीं, सहकारी चळवळीच्या नियोजनाबाबत व त्याप्रमाणें अंमलबजावणी करण्याचे कामीं सरकारास निमसरकारी सहकारी चळवळीवर विसंबून बसणें शक्य नाहीं. सहकारी चळवळीची प्रगति ठराविक काळांत व प्रमाणांत झाली पाहिजे असें आपल्या अहवालांत स्पष्ट सांगितलें असतांना आतां सहकारी चळवळीची वाढ करण्यांत घाई दाखविणें योग्य नाहीं असें श्री. सरय्या ह्यांचें म्हणणें आहे. समाजांतील जागृतीमुळें जर जनतेस सहकारी चळवळीची कास धरण्याचा मोह उत्पन्न झाला तर त्याला प्रत्यवाय कसा करतां येईल? उलटपक्षी जनता सहकारी चळवळीचा विस्तार करण्यास उत्सुक असेल तर त्याबाबत लागणारें तांत्रिक मनुष्यबळ व आर्थिक बळ एकत्रित करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. चळवळीचें स्वातंत्र्य व वैशिष्ट्य टिकविण्याचा आग्रह ज्या वेळीं शेती कर्जपुरवठ्याची जबाबदारी सहकारी चळवळीनें घ्यावी किंवा नाहीं हा प्रश्न चर्चिला जात असतां कांहींनीं धरला, त्या वेळीं हा प्रश्न उपस्थित करणारांचा उपहास केला गेला ह्याची येथें आठवण झाल्याविना रहात नाहीं. सहकारी चळवळीची पुनर्घटना करतांना तिचें रूपांतर सरकारी खात्यांत होईल ही भीति त्या वेळींच व्यक्त केली गेली होती. आतां श्री. सरय्या फक्त ती ऑक्सफर्ड येथील परिषदेपुढें मांडीत आहेत येवढाच त्यांत फरक आहे. सहकारी चळवळीचें आत्मनिरीक्षण करून त्याबाबत योग्य प्रमाणांत व योग्य दिशेनें वाढ कशी होईल व सहकारी संस्थांचे परस्पर संबंध काय असावे अशा बाबत मुंबई सहकारी इन्स्टिट्यूटमध्यें प्रस्ताव आला होता व तो कांहीं दुरुस्तीनंतर मंजूरहि झाला होता. परंतु त्याबाबत उपाययोजना होऊं शकली नाहीं. आतां तरी श्री. सरय्या यांच्या सूचनेचा विचार केला जाईल व त्याबाबत श्री. सरय्या आग्रह धरतील अशी आशा व्यक्त करण्यास हरकत दिसत नाहीं. श्री. सरय्या यांचें आजचें सहकारी चळवळींतील महत्त्वाचें स्थान लक्षांत घेतां त्यांना अशी विनंति करावीशी वाटते कीं, त्यांचे पूर्वीचे विचार व मतें ह्यामध्यें अनुभवानें जर कांहीं बदल झाला असेल (आणि तो झालेला दिसतो) तर त्या बाबत त्यांनीं निर्भीडपणानें, स्पष्ट शब्दांत व आग्रहपूर्वक विचार मांडून व त्याबाबत योजना आखून सहकारी चळवळीचें तारूं योग्य मार्गानें हाकलें जाण्यास मदत करावी, म्हणजे, त्या योगें सहकारी कार्यकर्ते व सहकारी चळवळ यावर मोठे उपकार होतील.

पुणें — आपला

१ ऑगस्ट, १९५१ — यशवंत दत्तात्रय खोले.

---

### साखरेची परिस्थिति निवळली

साखरेचें यंदाच्या वर्षाचें उत्पादन ११·२ लक्ष टन भरलें, असा सरकारी अंदाज आहे. गेल्या वर्षी सुमारें ९ लक्ष टन साखर तयार झाली होती. गेल्या पांच वर्षांत चालू वर्षाइतकें उत्पादन कधींच झालेलें नव्हतें. रेशनिंगसाठीं लागणारें सुमारें १० लक्ष टन उत्पादन वजा केलें, म्हणजे सुमारें १ लक्ष टन साखर खुल्या बाजारांत विकण्यास उपलब्ध होईल.

---

### आबादान येथील हिंदी अधिकारी

आबादान येथील पेट्रोलच्या कारखान्यांत २२ हिंदी इंजिनिअर व १९ हिंदी केमिस्ट कामावर आहेत. त्यांपैकीं पंचवीस अगोदरच रजेवर गेले आहेत. चौघे परत येण्याच्या मार्गावर आहेत आणि बाकीचे (सर्व इंजिनिअर) आबादानचा पाणी व वीजपुरवठा चालू राखण्यासाठीं आबादान येथेंच राहिले आहेत.

---

### को. कौन्सिलवर नेमणूक

बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह कौन्सिलवर २१ जुलैपासून खालील गृहस्थांची नेमणूक झाली आहे:—

श्री. जी. पी. मुर्डेश्वर, श्री. एम. एन. गांधी, श्री. व्ही. पी. पवार, श्री. एस. आर. कंठी, श्री. एस. डी. पाटील आणि प्रो. एम. आर. पाळंदे.

**संयुक्त प्रांतांतील जमीनदारी फंड**—संयुक्त प्रांतांतील जमिनदारी नाहींशी करण्यासाठी जमीनदारांना नुकसान-भरपाई देण्यांत यावयाची आहे. त्यासाठी सरकारतर्फें जमविण्यांत येणारी फंडाची रक्कम आता ३०·५१ कोटी रुपये इतकी जमली आहे. एकूण रक्कम सुमारें १५० कोटी रुपये जमवावयाची आहे. म्हणजे, उद्दिष्टाच्या २०·६ टक्के रक्कम आतांपर्यंत जमली आहे.

**संगीताचा कोश**—मद्रास विद्यापीठाच्या संगीत शाखेचे प्रमुख प्रो. पी. सांबमूर्ति हे दाक्षिणात्य संगीताचा आणि संगीतज्ज्ञांचा एक कोश तयार करीत आहेत. ह्या कोशाचे चार भाग प्रसिद्ध होणार आहेत. अशा प्रकारचा हा पहिलाच कोश तयार होत आहे, असें समजतें.

**कोपऱ्याआडून पाहूं शकणारे चष्मे**—टेलिव्हिजनचे कार्यक्रम आरामांत बघतां यावेत म्हणून नवीन प्रकारचे चष्मे अमेरिकेंत विकत मिळूं लागले आहेत. हे चष्मे वापरल्यानें बिछान्यांत पडल्या पडल्यासुद्धां टेलिव्हिजनचा पडदा दिसूं शकतो. वाचनासाठी पुस्तक डोळ्यासमोर-छातीवर धरलें असलें तरी सुद्धां कार्यक्रम पहाण्यास अडचण पडत नाहीं.

**मलायांतील हिंदी मुलांची सोय**—मलायांत स्थायिक झालेल्या हिंदी नागरिकांच्या मुलांना हिंदी शिकविण्यासाठी संयुक्त प्रांतांतील अझमगड ह्या ठिकाणाहून सहा हिंदी शिक्षक तिकडे जाणार आहेत. मलायांत जाऊन हिंदी शिक्षणाच्या शाळा काढण्याचा त्यांचा मनोदय आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— नवीन हंगामांत —

**४५ लक्ष रुपयांची साखर तयार झाली**

त्यापैकीं २० लक्ष रुपयांच्या साखरेची विक्री सरकारकडून अद्याप व्हावयाची आहे.

**साखरेचा नवीन हंगाम चार महिन्यांनीं सुरू होणार**

परंतु

**साखर–विक्रीचें सरकारी धोरण आहे तेंच कायम आहे**

यामुळें

**आणखी कांहीं महिने मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.**

★ शेअर–विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

★ ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. २५ जुलै १९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

**खादी मन्दिर**

१६१, बुधवार पेठ,
डमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## १९५० मधील बँकिंग : ताजे आकडे

हिंदी बँकिंगविषयक आकडेवार माहिती देणारें १९५० चें वार्षिक पुस्तक* नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. १९५० अखेरचे आकडे वर्षसमाप्तीनंतर केवळ सात महिन्यांत छापून ते उपलब्ध करून देण्यांत रिझर्व्ह बँकेनें अनुकरणीय तत्परता दाखविली आहे. हें वार्षिक ह्यापूर्वी कोणत्याच सालीं इतक्या तातडीनें प्रसिद्ध करण्यांत आलेलें नव्हतें.

अहवालाचे वर्षी शेड्यूल्ड बँकांची 'डिमांड' व 'टाइम' देणीं २८ कोटी रुपयांनीं वाढलीं. त्यापूर्वीच्या दीड वर्षांत तीं १५२ कोटी रुपयांनीं कमी झाली होती. परराष्ट्रीय व्यापारांतील अनुकूल तफावत, रिझर्व्ह बँकेनें सरकारी रोख्यांची खुल्या बाजारांत केलेली खरेदी आणि बँकांनीं दिलेल्या कर्जांत ३८ कोटी रुपयांची वाढ, ह्यामुळें ठेवींचा आकडा एवढा वाढूं शकला. कोरियन युद्धामुळें झालेली महागाई व मालाच्या खरेदीसाठीं धडपड ह्यांमुळें बँकांकडे कर्जाची मागणी पुष्कळच वाढली व दिलेल्या कर्जाची रक्कम १९४९ मध्यें १ कोटी रु. नें वाढली होती, ती अहवालाचे वर्षी ३८ कोटी रु. नीं वाढली.

जॉइंट स्टॉक बँका आणि मोठ्या सहकारी बँका ह्यांचेकडील ठेवींत २६ कोटींची भर पडून त्यांची रक्कम १०३७ कोटी रु. झाली. त्यांनीं दिलेलीं कर्जें १७ कोटींनी वाढून कर्जाची रक्कम ५६९ कोटी रु. झाली. मुख्यतः शेड्यूल्ड बँकांकडीलच ठेवी वाढल्या.

शेड्यूल्ड व सहकारी बँकांनीं दिलेलीं कर्जें वाढलीं, परंतु बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत ३३ कोटींची घट झाली. संख्येंत एकूण बँकांच्या एकशष्ठांशहि नसलेल्या शेड्यूल्ड बँकांकडे एकूण ठेवींच्या ८५% ठेवी होत्या आणि सर्व बँकांच्या एकूण कर्जांपैकीं ८०% कर्जें त्यांनींच दिलेलीं होतीं. आठ प्रमुख शेड्यूल्ड बँकांकडे एकूण ठेवींपैकीं ७०% ठेवी होत्या. बिगर-शेड्यूल्ड बँकांपेक्षा सहकारी बँकांचें महत्त्व आतां अधिक झालें आहे. सहकारी बँकांकडे ९० कोटींच्या ठेवी होत्या व त्यांनीं ६१ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले होते. ह्याउलट, बिगर-शेड्यूल्ड बँकांनीं ७२ कोटींच्या ठेवी पत्करून ४७ कोटींचीं कर्जं दिलेलीं होतीं.

खालील तक्त्यांत हिंदी जॉइंट स्टॉक बँकांची गेल्या तीन वर्षांतील प्रगति तुलनात्मक आकडे देऊन स्पष्ट केली आहे:—

( आकडे कोटी रुपयांचे आहेत. )

| | ठेवी | रोख | रोखीचें ठेवीशीं प्रमाण% | कर्जें | कर्जांचें ठेवीशीं प्रमाण% | भारतांतील बँका |
|---|---|---|---|---|---|---|
| १९४८ | १०१० | १५६ | १५·५ | ५०५ | ५०·१ | ४६७४ |
| १९४९ | ९२३ | १४७ | १६·० | ४९१ | ५३·२ | ४४४१ |
| १९५० | ९४६ | १३३ | १४·२ | ५०७ | ५३·७ | ४३५३ |

अहवालाचे वर्षी बँकांच्या कॅशचें प्रमाण उतरलेलें आढळतें. त्यांची इनव्हेस्टमेंट २० कोटी रु. नीं वाढली. १९४९ मध्यें ती ९४ कोटी रु. नीं कमी झाली होती. बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ झाली, त्याला परदेशी शेड्यूल्ड बँकांनीं मोठा (१४ कोटी रुपयांचा) हातभार लावला. हिंदी शेड्यूल्ड बँकांचीं कर्जें फक्त ७ कोटी रुपयांनींच वाढलीं.

जॉइंट स्टॉक बँकांच्या एकूण कचेऱ्यांत ८८ ची घट झाली. त्यांत शेड्यूल्ड बँकांच्या ७३ कचेऱ्या होत्या. बँकिंगच्या सोई प्रमुख शहरांतच कशा एकत्रित झाल्या आहेत, हें खालील तक्ता स्पष्ट करील.

| कितीपेक्षा ज्यास्त वस्तीचीं गांवें ? | गांवांची संख्या | कचेऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ लक्षपेक्षा जास्त | ७२ | १७०९ |
| १ लक्ष ते ५० हजार | १०३ | ६८७ |
| ५० हजार ते १० हजार | ७०१ | १७८२ |
| १० हजार ते ५ हजार | २८९ | ४३१ |
| ५ हजाराचे खाली | १७८ | २२७ |
| इतर | २११ | २४१ |
| | १५५४ | ५०७७ |

१९५० च्या वार्षिकांत कांहीं नव्या माहितीचे तक्ते समाविष्ट करण्यांत आले असून पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्यांत आली आहे.

* स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया, १९५०. रिझर्व्ह बँकेचें प्रकाशन पृ. सं. १९७. किं. ६ रु.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस–गिरगांव, मुंबई.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

मे, १९५१ मध्यें झालेल्या इंडियन मर्चन्टस् चेंबरच्या डि. कॉम, डिप्लोमा परिक्षेस या इन्स्टिट्यूटमधून २१ विद्यार्थी बसले व त्यांपैकीं खालील १९ (शेकडा ९०%) पास झाले.

डि. कॉम. डिप्लोमा

(स्पेशलाइज्ड कंपनी सेक्रेटरीयल ग्रुप)

बर्वे व्ही. के., देवकुळे एम्. एन्., गोडसे जी. व्ही., (डिस्टिंग्शन इन् बुककीपिंग ॲन्ड अकौन्टन्सी), जैनी आर. बी., (डिस्टिंग्शन इन् बुककीपिंग ॲन्ड अकौन्टन्सी), खर्शीकर के. टी., मूर्ती एच्. एस्. एन्., मरकळे एस्. एस्. (डिस्टिंग्शन इन् बुककीपिंग ॲन्ड अकौन्टन्सी ), म्हैसकर के. जी., म्हैसकर एन्. आर., नातू के. व्ही., ओक व्ही. व्ही., पावसकर एम. आर., पाटील जी. व्ही., पाटील एस्. जे., फडके एस्. के., (डिस्टिंग्शन इन् प्रॅक्टिकल कॉमर्स ॲन्ड फायनान्स ), व्ही. रामसुब्रमनियम, सप्रे एल. एस्., ठाकूर एम्. एस्., बी. वेंकटरमण, (डिस्टिंग्शन इन् बुककीपिंग ॲन्ड अकौन्टन्सी ).

इन्स्टिट्यूट ऑफ बुक-कीपर्स, लंडन

विषय:—बुककीपिंग (असोसिएट स्टेज)

या परिक्षेस, जून १९५१ मध्यें तीन विद्यार्थी बसले व तीनही उत्तीर्ण झाले आहेत:—

नेरकर एम्. पी., थेटे के. आर., गुळुंचकर डी. के.

S. H. Dhupkar,
Secretary,
Deccan Institute of Commerce, Poona

## एअर इंडिया लि.

वरील कंपनीस ३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी वहातुकीपासून २,०५,४५,८३५ रु. मिळाले. बुकिंग एजंटांना ४,३५,५४८ रु. कामिशन दिल्यावर वहातुकीचें निव्वळ उत्पन्न २,०१,१०,२८७ रु. झालें. इतर कंपन्यांकडून मिळालेलें कामिशन, एअर-इंडिया इंटर नॅशनल लि. च्या टेक्निकल मॅनेजमेंटची फी, पेट्रोल करावर रिबेट, इतर उत्पन्न, इत्यादि मिळकत त्यांत मिळविली म्हणजे एकूण उत्पन्न २,३८,७५,६५१ रु. होतें. पगार व मजुरी ८०,३१,००३ रु. तेल व पेट्रोल ६७,८१,१५२ रु. घसारा २३,५०,००० रु. इत्यादि सर्व खर्च वजा जातां २,५५६ रु. निव्वळ तोटा राहिला. डायरेक्टरांनीं कांहींहि फी घेतली नाहीं. गेल्या वर्षी ११ लक्ष, ४५ हजार रु. घसारा काढला होता. अहवालाचे वर्षी घसाऱ्याची पूर्ण तरतूद करण्यांत आली आहे. ३१ डिसेंबर, १९५० रोजीं कंपनीजवळ ७ व्हायाकिंग्ज, १२ डकोटाज आणि १ स्कायमास्टर एवढीं विमानें होतीं. कंपनीच्या नोकरींत ३,१६५ नोकर होते. कै. सर गुरुनाथ बेवूर, हे कंपनीचे २ वर्षें मॅनेजिंग डायरेक्टर होते. त्यांच्या सेवेचा अहवालांत प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला आहे.

कंपनीचें वसूल भांडवल १३/४ कोटी रुपये असून तिचा घसारा फंड ८५,९८,४४६ रुपयांचा आहे. तिनें इंपीरिअल बँकेकडून ३६,६९,९९९ रुपयांचें डिमांड कॅश क्रेडिट घेतलेलें आहे. ताळेबंदाच्या जिंदगीचे बाजूस गुडविल, एअर मेल कंत्राटें इत्यादींची किंमत २० लक्ष रु. धरण्यांत आली असून भांडवली खर्च १,४७,००,३६० रु. आणि स्पेअर पार्टस ६४,८८,२०७ रु. असे आकडे आहेत. कंपनीनें एअर-इंडिया इंटर नॅशनल लि. चे २०,००,००० रु. चे भाग घेतलेले आहेत त्यांची बाजारांतील किंमत १२,८०,००० रु. आहे.

### कंपनीची विमान वहातुक

कंपनीच्या विमान वहातुकीचा तपशील खालीं दिला आहे:—

| मार्ग | मैल | किती वेळा |
|---|---|---|
| मुंबई-अहमदाबाद-कराची | ६४७ | रोज |
| मुंबई–कराची | ५४५ | " |
| मुंबई-मद्रास-तिरुचिरापल्ली-कोलंबो | ११११ | " |
| मुंबई-अहमदाबाद-जयपूर दिल्ली | ७४९ | आठवड्यांतून तीनदां |
| मुंबई–दिल्ली ( दिवसा ) | ७०८ | रोज |
| मुंबई-दिल्ली ( रात्रीं ) | ७५३ | " |
| मुंबई-कलकत्ता | १०४१ | " |
| मद्रास-बंगलोर-कोइमतुर-कोचीन-त्रिवेंद्रम | ५१७ | " |

कै. सर गुरुनाथ बेवूर ह्यांच्या जागीं श्री. के. सी. बखले ह्यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. ते टाटा इंडस्ट्रीजचे व आतां एअर इंडिया लि. चेहि डायरेक्टर झाले आहेत. श्री. बखले हे पूर्वी चीफ कामिशनर ऑफ रेल्वेज होते व त्यांचा कारभारविषयक व वहातुकविषयक अनुभव कंपनीला उपलब्ध झाला आहे.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

# दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चीत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

# ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दर साल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.